तरुण भारत
सोमवार, १५ डिसेंबर २०१४

# 'वटवृक्षाची जशी सावली, तशीच असते आई..!'

**विष्णू वाघ यांच्या काव्यगायनाने रसिक भारावले** दोडामार्ग महाविद्यालयात रंगली काव्यमैफिल : मराठी भाषा, वाङ्मय मंडळाचे आयोजन

वार्ताहर
दोडामार्ग

'माझे काळीज प्रिंटिंग, तू माझी इंपोर्टेड शाई, छापायला गेलो तुझे नाव – जाई, पण, प्रुफरिडर झोपला अन छापून आले ताई', तसेच 'वटवृक्षाची जशी सावली, तशीच असते आई, आई म्हणजे अपार डोंगर, मेहनत अन् कष्टांचा', अशा विविध कविता गोव्यातील प्रसिद्ध साहित्यिक विष्णू सुर्या वाघ यांनी आपल्या शैलीत सादर करून उपस्थितांना खळखळून हसायला लावले तर कधी भावनात्मक कवितांनी रडायला लावले. आईवरील कवितेने तर उपस्थित सर्वजण भावूक झाले.

निमित्त होते दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या मराठी भाषा व वाङ्मय मंडळातर्फे आयोजित केलेल्या काव्य मैफिलीचे. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी, त्यांच्यात मराठी साहित्याविषयी आवड निर्माण व्हावी, या हेतूने महाविद्यालयात मराठी भाषा व वाङ्मय मंडळातर्फे वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. कवितेविषयी गोडी निर्माण व्हावी यासाठी मराठी, कोकणी व मालवणी काव्यमैफिलीचे आयोजन केले जाते. या उपक्रमांतर्गत गोव्यातील प्रसिद्ध साहित्यिक व आमदार विष्णू सुर्या वाघ यांची काव्यमैफिल आयोजित करण्यात आली होती. या मैफिलीस उपस्थितांनी भरभरून दाद दिली.

**मराठी, कोकणी मालवणी कवितांचे सादरीकरण**

**कविता जगण्यातून आली पाहिजे!**

यावेळी आमदार वाघ म्हणाले, कविता ही आपल्या अवतीभवतीच, प्रत्येक गोष्टीत असते. पण, ती टिपता आली पाहिजे. तशी नजर आपल्याकडे असायला हवी. तरच आपण कविता लिहू शकतो. कविता ही आपल्या जगण्यातून आली पाहिजे. निसर्गातल्या प्रत्येक गोष्टीत कविता असते. आपल्या अवतीभवती ती वावरत असते. फक्त तिला पहायला शिकले पाहिजे. सभोवतालच्या वातावरणाशी जुळवून घेतले तरच कविता होऊ शकते. कविता ही माणसाला जगायला शिकविते, ती जगण्याला अर्थ देते. कवितेतील शब्द कधी हसवतात, रडवतात, कधी अंतर्मुख करतात. त्यातून जगण्याला एक नवीन प्रेरणा मिळते. निसर्गाकडे कवीच्या नजरेने पाहिले पाहिजे. यावेळी त्यांनी आपल्या शैलीत विविध कविता सादर करताना उपस्थितांना खळखळून हसायला लावले तर कधी भावनात्मक कवितांनी रडायला लावले.



**दोडामार्ग : येथील काव्यमैफिल कार्यक्रमप्रसंगी साहित्यिक व आमदार विष्णू सुर्या वाघ यांचा सत्कार करताना डॉ. व्ही. ए. पाटील. बाजूला भाई परमेकर, विवेकानंद नाईक व अन्य.**

पाहुण्यांचा परिचय, प्रास्ताविक व कवी विष्णू सूर्या वाघ यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केला. यावेळी व्यासपीठावर स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य भाई परमेकर, विवेकानंद नाईक, सूचन कोरगावकर, ॲड. प्रवीण नाईक, प्रेमप्रकाश नाईक, ज्येष्ठ लेखक चंद्रकांत गावस, पत्रकार शिरीष नाईक, उपस्थित होते. सूत्रसंचालन वाङ्मय मंडळाचे प्रमुख प्रा. दिलीप बर्वे तर आभार प्रा. सोपान जाधव यांनी मानले.